दरोडा विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड आयुक्तालय
पत्ताः- यमुणानगर, निगडी, पुणे.
इमेल आयडी- piantideco.pcpc-mh@gov.in

**प्रेसनोट दिनांक ०९/०६/२०२३**

**सोन्या काळभोर टोळीतील सराईत गुन्हेगाराकडुन ०१ पिस्टल व ०१ जिवंत काडतुस दरोडा विरोधी पथकाकडुन जप्त**

मा. पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चोबे सो. यांनी पिंपरी चिंचवड आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध्द शस्त्र बाळगणाऱ्या इसमांची बातमी प्राप्त करुन त्यांचेविरुध्द कडक कार्यवाही करणेबाबत आदेश दिलेले होते. सदर आदेशाप्रमाणे मा.जितेद्र कदम, पोलीस निरीक्षक, दरोडा विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिं. चिं. यांनी त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांना त्याबाबत सुचना दिलेल्या होत्या.

आकुर्डी व निगडी भागातील कुख्यात गुन्हेगार सोन्या काळभोर याचे टोळीतील सराईत गुन्हेगार बाळासाहेब सातपुते हा सध्या आकुर्डी व निगडी भागामध्ये सदर टोळीच्या वर्चस्व वाढविण्याचे काम करीत होता. स्थानिक नागरीकांना दमदाटी करण्याचे काम तो सध्या करीत होता त्याचे दहशितीमुळे स्थानिक नागरीक हे पोलीसांत तक्रार देण्यास देखील पुढे येत नव्हते. सध्या तो स्वतःजवळ पिस्टल बाळगुन स्थानिक व्यापाऱ्यांना दमदाटीचे करण्याचे व सोन्या काळभोर या टोळीचे वर्चस्व वाढविण्याचे काम करीत असताना दरोडा विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिं चि कडील अधिकारी व अंमलदार हे त्याचे मागावर होते. त्यादरम्यान **पोलीस शिपाई २६४३ गणेश सांवत ,पोलीस शिपाई २६७३ सुमित देवकर व पोलीस शिपाई २९४७ विनोद वीर** यांना नमुद सराईत गुन्हेगार बाळासाहेब सातपुते हा कमरेस पिस्टल लावुन भक्ती शक्ती चौकाकडुन क्रिष्णा वेज हॉटेलकडे जाणाऱ्या रस्त्याने जात आहे. अशी बातमी प्राप्त होताच त्यांनी सदरची बातमी ही पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांना सांगितली असता. त्यांनी त्यांचे अधिपत्याखालील पो.हवा/७०२ उमेश पुलगम, पो.ना./१०६२ गणेश हिंगे, पो.ना./१२३४ प्रविण कांबळे पो.ना./१४५८ आशिष बनकर, पो.शि./२६४३ गणेश सांवत व पो.शि./२९४७ विनोद वीर व पो.शि./२६७३ सुमित देवकर यांना बातमीची खातरजमा करुन कारवाई करणेबाबत सुचना दिल्या.

नमुद पथकाने डॉ बाबासाहेब आंबेडकर रोड कडुन ट्रान्सपोर्ट नगरकडे जाणाऱ्या वळणास, निगडी प्राधिकरण, पुणे येथे सापळा लावला. नमुद इसम हा सदर परिसरात आल्यावर त्यास पोलीस त्याचे मागावर असल्याची चाहुल लागताच त्याने तेथुन पळुन जाण्याचा प्रयत्न केला. दरोडा विरोधी पथकाकडील वरील स्टाफने त्याचा पाठलाग करुन त्यास शिताफिने ताब्यात घेतले.

नमुद सराईत गुन्हेगार नामे बाळासाहेब अंगदराव सातपुते, वय - २६ वर्षे, रा - अनुबाई काळभोर चाळ, आकुर्डी, पुणे याचेकडुन **१.** ३५,००० रुपये किं ची एक सिल्वर रंगाची लोंखडी गावठी पिस्टल **२.** १,००० रुपये किं चे एक जिवंत पितळी काडतुस हे जप्त करण्यात आलेले आहे. नमुद इसमाविरुध्द निगडी पोलीस स्टेशन येथे भारतीय हत्यार कायदा कलम ३ (२५) महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) सह १३५ प्रमाणे. गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

**आरोपी बाळासाहेब अंगदराव सातपुते याचे वरील पुर्वीचे दाखल गुन्हे.**

१. निगडी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड गुन्हा रजि.नं. १३४/२०२१ भा.द.वि. कलम ३०७ व इतर प्रमाणे
२. निगडी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड गुन्हा रजि.नं.      /२०२१ शस्त्र अधिनियम क ४(२५) प्रमाणे
३. निगडी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड गुन्हा रजि.नं. २१३८/२०२१ मो व्हे ॲ क १८४,१८५,१३० प्रमाणे

सदर कामगिरी मा. श्री. विनयकुमार चौबे सो. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. श्री. संजय शिदे सो., सह पोलीस आयुक्त, पिपरी चिचवड, मा. स्वप्ना गोरे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे शाखा, मा श्री कोपनर सो. सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, १, श्री. जितेद्र कदम, पोलीस निरीक्षक, दरोडा विरोधी पथक, गुन्हे शाखा, पो हवा उमेश पुलगम पो ना आशिष बनकर, पो ना प्रविण कांबळे, पो ना गणेश हिंगे, पो. शि. विनोद वीर, पो शि. गणेश सावंत पो. शि. सुमित देवकर सर्व नेमणुक दरोडा विरोधी पथक गुन्हे शाखा यांनी सदरची उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप-आयुक्त,
गुन्हे शाखा, पिंपरी चिचवड